# संकलित मूल्यमापन -2 (2022-23)

**शाळेचे नाव :**

इयत्ता: 6 वी | गुण : 30

विषय : मराठी | वेळ : 90 मिनिटे

---

**प्र. I सूचनेप्रमाणे लिहा.**

**1) खालील म्हणी पूर्ण करा.** **(1X2=2)**

a) गाढवाला ................. ची चव काय?

b) ............. कळसा ................ वळसा.

**2) रिकाम्या जागा भरा.** **(1X2=2)**

अ) विमान चालविणाऱ्याला .......................... म्हणतात.

आ) .................... पत्र वाटण्याचे काम करतो.

**3) खालील वाक्ये विरामचिन्हांचा वापर करून पुन्हा लिहा.** **(1X2=2)**

अ) माझ्या गावाजवळ नदी आहे

आ) अरे वा तिथे तुला काही नवीन आढळले

**4) खालील शब्दांचा वाक्यात उपयोग करून वाक्य लिहा.** **(1X2=2)**

1) दु:ख - 2) शौर्य

**5) समानार्थी शब्दांच्या जोड्या जुळवा.** **(1X4=4)**

| अ) | ब) |
|---|---|
| a) आकाश | अ) पुष्प |
| b) पक्षी | आ) सखा |
| c) फुल | इ) नभ |
| d) मित्र | ई) पाखरे |

**प्र. II खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.** **(2X6=12)**

1) विरामचिन्हे कोणकोणती आहेत?

2) तुम्हाला माहित असलेले कोणतेही सहा व्यवसाय लिहा.

3) शाळेतील कोणत्याही एका कार्यक्रमात शिक्षकांनी केलेले भाषण तुमच्या शब्दात पाच ओळीत लिहा.

4) खालील वाक्यातील वाकप्रचार ओळखा.

अ) मला शाळेचा लळा लागला आहे.

आ) पोलिसांना पाहताच चोरांनी धूम ठोकली.

5) बाग आणि बसस्थानक याठिकाणी आढळणाऱ्या दोन सूचना लिहा.

6) तुमच्या समोर दोन गाड्यांचा अपघात झाल्यास तुम्ही जखमींना कशी मदत कराल?

**प्र. III खालील प्रश्नांची चार पाच वाक्यात उत्तरे लिहा.** **(3X2=6)**

**1) उतारा वाचून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

एक कोल्हा होता. तो एका खोपटात शिरून काही तरी खायला मिळविण्याच्या शोधात होता. तेवढ्यात एक कोंबडी त्याच्या दृष्टीस पडली. पण ती उंच माळ्यावर बसली होती. यामुळे तिच्याजवळ त्याला जाता येईना. मग तिला युक्तीने खाली आणून मारून खावी या हेतूने कोल्हा तिला म्हणाला, 'कोंबडीताई तू बरी आहेस ना? तू बरेच दिवस आजारी असून घरातच झोपून आहेस असं समजलं. तेव्हापासून तुझ्या काळजीनं मला झोप येईना. थोडावेळ खाली उतर म्हणजे मी तुझी नाडी तरी पाहीन.' याप्रमाणे अघळपघळ बोलून कोल्हा तिची स्तुती करीत होता.
हे ऐकून कोंबडी बसल्या जागेवरूनच म्हणाली, 'खरच भाऊ, तू जी बातमी ऐकली ती अगदी खरी आहे. मी आजारी आहे. मी आता खाली उतरून तुझ्याकडे आले असते, पण डॉक्टरने मला अगदी बजावून सांगितले आहे की, तू आपली जागा सोडून कुठेही जाऊ नकोस. कारण अशक्तपणामुळे जागेवरून हलण्याचे श्रम माझ्याने सोसणार नाहीत, आणि म्हणून मला खाली यायला होत नाही. सध्या मी इतकी अशक्त आहे की, जर मी उतरून खाली असते तर माझे प्राणच जातील. तरी आता तू यावेळी जा.'

a) कोंबडी कोठे बसली होती?
b) कोल्हा कोंबडीची स्तुती का करत होता?
c) वरील कथेमध्ये स्वार्थी कोण आहे?

**2)** शाळेमध्ये साजरा केला जाणारा कोणताही एक कार्यक्रम / जयंती याबद्दल तुझ्या शब्दात दहा ओळी लिही.